# स्त्री जन्माची कहाणी......

* प्रा. डॉ. अर्चना पंढरीनाथ मोरे

‘ 8 मार्च जागतिक महिला दिन ’,
‘25 मार्च भारतीय स्त्री–मुक्तिदिन ’,
‘3 जानेवारी स्त्री–मुक्तिदिन ’

आम्ही मोठया स्वाभीमानाने साजरे करतो. या तीन दिवसातलं साजरेपण सोडलं तर नित्याच्या जीवनात अनेकदा ‘ स्त्रीत्व ’ दुखावलं जातं. अपसुकच अशावेळी ती स्वतःच्या विचारात हरवून जाते. हा विचार तिच्या जीवनाच्या वाटचालीत मोलाचा ठरतो. ‘ स्त्री ’ म्हणजे प्रेम, वात्सल्य आणि करुणेची मूर्ती. ममता, दया, संयम, निष्ठा, चिकाटी, विवेक, सर्जनशीलता अशा अगणित गुणांचा संगम तिच्या ठायी आहे. ही स्त्री मानवी जीवनाचा श्वास आहे. प्राचीन काळापासून स्त्री समाजाच्या चिंतनाचा विषय राहिली आहे. मानव पृथ्वीतलावर अस्तित्वात आल्यानंतर इ.स.पू. 3 हजार वर्षापर्यंत मातृवंषीय समाजव्यवस्था अस्तित्वात होती. जंगल युगातील मानव हा पूर्णपणे निसर्गावर अवलंबून होता. संरक्षणासाठी झाडावर चढून बसणारा, उदरनिर्वाहासाठी जंगल संपत्तीवर अवलंबून असणारा होता. त्याला विचारषक्तीचं दैवी देणं मिळालेलं होतं. पुढे या शक्तीत अभूतपूर्व वाढ झाली. या काळातील मानवी जीवन अतिशय खडतर होते. अन्नासाठी भटकंती आणि वस्त्र, निवारा हे कल्पनाबाहय होते.

निसर्गतःच स्त्री अपत्यकेंद्री आहे. अपत्यांचा सुरक्षित जन्म, संरक्षण, संगोपन स्त्री एकटीच करीत असे. श्यासाठी ती उपजत बळाचा वापर करायची. जंगल युगातील स्त्री भयानक हिंस्त्र आणि रानटी ताकदीची होती. स्त्री–पुरुषांच्या ताकदीत फरक नव्हता. शारीरिक बळाला बुध्दीची जोड देवून उन, वारा, पावसाला तोंड देत मातृत्व–अपत्य हे सुखद नातं स्त्रीनं जोपासलं, वाढवलं. जंगली अवस्थेतून रानटी अवस्थेत आल्यानंतर मानवी जीवनात थोडी प्रगती झाली. तो निवाऱ्यासाठी गुहेचा, उब मिळविण्यासाठी अग्नीचा वापर करु लागला. बाळाला जन्म देण्यासाठी स्त्रीला गुहा सुरक्षित वाटू लागली. गुहेमुळे तिच्या जीवनात स्थिरता आली. बाळासाठी गुहेत राहणारी स्त्री पुरुषाआधी स्थिर झाली. एकाच जागेवर राहून सृष्टीचे निरीक्षण करु लागली. जमीनीमध्ये बी पेरल्यानंतर ठराविक काळानंतर अन्नाची निर्मिती होवू शकते त्यासाठी भटकंतीची गरज नाही हे तिच्या लक्षात आले. यातूनच शेतीचा शोध लागला. जीवन जगणं सुसहय व्हावं यासाठी ती सतत धडपडत असे. शरीर संरक्षणासाठी मेलेल्या प्राण्यांची कातडी आणि झाडांच्या सालीचा वापर, बाळाला अन्न खाता यावं म्हणून ते शिजवण्याचा प्रयत्न करु लागली. स्त्रीला मुल होणं हा चमत्कार समजला जायचा. स्त्री आणि तिची अपत्यं यांचच कुटुंब होतं. पुरुष नामानिराळा असायचा अपत्याचं संगोपन करीत परिस्थितीशी झगडू लागली. या संघर्षात तिला अनेक जीवनावश्यक गोष्टींचे ज्ञान झाले. तिचे हे ज्ञान मानवी जीवनाचे समूह पातळीवर संरक्षण करणारे होते. यातूनच संस्कृती युगाचा उदय झाला. स्त्रीचे बौद्धीक कौशल्य विकसित होउ लागले तसा तिच्या शारीरिक ताकदीचा वापर कमी झाला. स्त्री–पुरुषांच्या शारीरिक ताकदीत तफावत निर्माण होउ लागली. याचा परिणाम येणाऱ्या पुढील पिढयांमध्ये झाला. अपत्याच्या संरक्षणासाठी कमी पडू लागलेल्या स्त्रीने पुरुषाची मदत घेतली. शारीरिक क्षमतेची कामे पुरुषाकडे आणि बौद्धीक पातळीवरची कामे स्वतः करु लागली.

अपत्यांना सांभाळत अन्न पदार्थ जमवणे, शेती करणे, वस्त्र तयार करणे, आरोग्याची काळजी घेणे ही कामे स्त्री करु लागली. कुटुंबासाठी परिस्थितीशी झुंज देवू लागली. परिणामी कुटुंबात तिचे स्थान महत्वाचे झाले. स्त्री प्रधान कुटुंबव्यवस्था अस्तित्वात आली होती. ‘जगणे व जगवणे’ या मुळच्या ओबडधोबड तत्वाला स्त्री मातेच्या सृजनशीलतेने एक विशेष उंची प्राप्त करुन दिली.[1] इ.स. पूर्व 2 ते 3 हजार वर्षापूर्वी नांगराचा शोध लागला. यापूर्वी स्त्री तीक्ष्ण हाडे, झाडांची खोडे यांच्या सहाय्याने शेती करीत असे. नांगराच्या शोधाने पुरुषांचा शेतीतील सहभाग वाढला. पुढे शेती पूर्णपणे पुरुषी वर्चस्वाखाली आली. शेतीची कामे आणि उत्पन्नही वाढले. पुरुषांचा कार्यभाग स्त्री पेक्षा मोठा झाला. स्त्रीचे क्षेत्र कुटुंबाचा सांभाळ करण्यापुरते राहिले आणि पितृप्रधान संस्कृतीची पार्श्वभूमी तयार झाली. वैदिक काळापर्यंत स्त्रीला समाजात आदराचे स्थान होते. सिंधू संस्कृतीत मातृदेवतेची उपासना केली जात असे. द्रविडांमध्ये मातृसत्ताक कुटुंबपध्दती अस्तित्वात होती. स्त्री सर्व संपत्तीची अधिकारी होती. वैदिककाळात पुरुषांप्रमाणे स्त्रीवर उपनयन संस्कार करुन गुरुगृही शिक्षणासाठी पाठविले जाई. शिक्षण घेणा–या स्त्रियांचे दोन प्रकार होते. 1. साध्योवधु–विशीष्ट वेळेत शिक्षण पूर्ण करुन गृहस्थाश्रम स्वीकारणारी.

**2. ब्रहमवादिनी–ज्या अजन्म शिक्षण घेत.**[2]

मुलींच्या शिक्षणाचा प्रचार होऊन उद्दालिका, गार्गी, मैत्रयी या विदुषी या काळात झाल्या. नृत्य गायन, युध्दकलेतही त्या पारंगत होत.[3] पती निवडण्याचे, पतीनिधनी नंतर दुसरा विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. हुंडा, बुरखा पद्धती, सतीची चाल अस्तित्वात नव्हती. विवाहप्रसंगी वधुस गोधन दिले जात असे.

*महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

आदर्श माता आणि शूर सैनिक हे विवाह संस्थेचे उद्दिष्ट होते. नेपोलियन देखील 'Give me good mothers and I will give you a good nation ' असे म्हणतो.[4]

उत्तरोत्तर काळात सामाजिक परिस्थितीत मोठा बदल झाला. पुरुष साम्राज्य विस्तारात गुंतत गेले. स्त्रिया संसाराची जबाबदारी पेलत शेती, शिवणकाम करु लागल्या.[5] स्त्री पुरुषांमध्ये श्रमविभागणी होवून त्यात साचेबंदपणा येवू लागला. वर्णव्यवस्था ताठर झाली. स्त्री स्वातंत्र्याला मर्यादा पडू लागल्या. ऋग्वेद, महाकाव्ये, पुराणे यातील काही निंदेचे उल्लेख तिच्या अवनतीचे दर्शक आहेत. ऋग्वेदाच्या अखेरीस आर्य लिहितात, ' स्त्रियांबरोबर सख्य असू शकत नाही. कारण त्यांची हृदये लांडग्याच्या ह्रयासारखी असतात.' 'किं क्रूरम ' या प्रश्नाला यात उत्तर आहे. ' स्त्री हृदय ' स्त्री संदर्भात इंद्राचे भाष्य आहे,'स्त्रीचे मन ताब्यात राहत नाही आणि बुध्दी हलकी असते.'[6] उपनिषद काळात तिचा दर्जा खालावलेला होता. मुलींची लग्ने बालवयात होवू लागली. लग्नामध्ये दिल्या जाणाऱ्या धनसंपत्तीचे महत्त्व वाढू लागले होते.

अभिजात संस्कृत काळात स्त्रियांची परिस्थिती अधिकच शोचनीय झाली. मुलगी जन्माला येणे कुटुंबासाठी दुःखाची बाब बनली.[7] बहुपत्नीत्वाची प्रथा वाढीस लागली. विधवा विवाहावर बंदी आली. उपनयन संस्कार स्त्रियांसाठी राहिला नाही. स्त्री–शिक्षणाबाबत उदासीनता निर्माण झाली. या काळात गांधारी, द्रोपदी, अनसूया, कैकेयी अशा विव्दान स्त्रिया होवून गेल्या. द्रोपदी सारख्या विदुषीलाही पुरुषी विटंबनेला तोंड दयावे लागले. राम आणि रावण हे अनुक्रमे आर्य आणि द्रविड समाजाचे प्रतिनिधी रावणाची बहिण शूर्पणखा ही रामाकडे स्वतःच्या विवाहासाठी, त्याला मागणी घालण्यास येते. तेंव्हा लक्ष्मण तिचे नाक–कान कापून विटंबना करुन पाठवून देतो. त्याचा सूड म्हणून रावण रामाची पत्नी सीता पळवून नेतो. मानव लोकात परमेश्वराचा अवतार समजल्या जाणा–यांचे हे शौर्य आणि सूडाचे रणकंदन माजले त्यात स्त्री होरपळून निघाली. महाभारताच्या अनुशासन पर्वात म्हटले आहे. 'क्षुरधारा विष सर्पो वन्हिः इति एकतः स्त्रियः 'म्हणजे वस्तऱ्याची धार, सापाचे विष आणि अग्नि हे सर्व एकत्रितपणे स्त्री मध्ये आढळते.[8] स्त्री मृत्युच्या दाढेत जावून पुरुषाला जन्माला घालते त्या पुरुष जातीचे हे उद्‌गार त्याच्या अधमतेची कल्पना देतात. ''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता।/यत्रे तास्तु न पूज्यन्ते सर्वा स्तत्रा फलः क्रिया।। ''[9]

असा स्त्रिचा गौरव मनुने केला असला तरी स्त्री चार भिंतीआड बंदिस्त झाली. तर कधी–कधी या भिंती छळछावण्या झाल्या. मनु, स्मृतिकारांनी त्यांच्या काळापर्यंत स्त्रियांचे राहिलेले थोडे फार अधिकारही हिरावून घेतले. एकेकाळी भारतीय संस्कृतीत पूजनीय असलेली स्त्री शूद्रापलीकडची समजली जावू लागली. वर्ण संकराच्या शीतीमुळे किंवा स्वार्थामुळे एकेका क्षेत्रातून स्त्रिची हकालपट्टी सुरु झाली. नवऱ्याच्या पश्चात त्यांना समाजात काहीच स्थान उरले नाही. स्वातंत्र्य, स्वावलंबन व मानाचे जीवन याला स्त्रिया अंतरल्या फक्त त्यांच्या नशिबी कष्ट व पतिसेवा हेच उरले.[10] उत्तर वैदिक काळानंतर सामाजिक विषमता वाढली. सर्व धर्मग्रंथाची रचना संस्कृत शाषेत हेती. सर्व सामान्यांना संस्कृत भाषा येत नव्हती. त्यांच्यासाठी धर्म असून नसल्यासारखा झाला होता. या जनसामान्यांना दिलासा देण्याचे कार्य जैन आणि बौद्‌ध धर्माने केले. या दोन्ही धर्मात वर्णव्यवस्था अस्तित्वात नव्हती. तिथे स्त्री–पुरुष असा भेद नव्हता. स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. बालविवाहाचे प्रमाण कमी होत होते. विधवा विवाह मान्य होवू लागला होता. वरवर जरी हे चित्र दिसत असले तरी वास्तव भिन्न होते. जगातील सर्व धर्माचे प्रवर्तक पुरुष आहेत. अशा महान पुरुषांनीदेखील स्त्रिनिंदेची संधी सोडली नाही. गौतमबुद्ध त्यांचे पट्टशिष्य आनंद यास म्हणतात, ''जर स्त्रियांना बौद्‌ध धर्मात प्रवेश दिला नसता तर बौद्‌ध धर्म 1000 वर्षे टिकला असता परंतु स्त्रियांना बौद्‌ध धर्मात प्रवेश दिल्याने तो आता 500 वर्षाच्या वर टिकाणार नाही.''[11]

गुप्तकाळात (इ.स. 400) शुद्र आणि त्यांच्या स्त्रियांमध्ये थोडी सुधारणा झाली. त्यांना महाकाव्ये, पुराणे श्रवण करण्याचा म्हणजे भक्ती–मुक्तीचा अधिकार देण्यात आला. वैश्य व शुद्र वर्णातील स्त्रिया काही ना काही काम करुन स्वतःच्या उपजीविकेपुरते कमावीत. त्यांना इतरांवर अवलंबून राहण्याची गरज नसल्याने त्या बऱ्याच स्वतंत्र होत्या पण ब्राह्मण व क्षत्रिय स्त्रियांना उपजिविकेसाठी काम करण्याची मनाई असल्याने त्यांना अर्थिक बाबींसाठी पुरुषांवर अवलंबून रहावे लागे. परिणामी गुप्त काळातील पहिल्या दोन वर्गातील स्त्रियांची स्थिती भोगदासी सारखी झाली होती. एवढेच नव्हे तर स्त्रिला पुरुषांशिवाय स्वतंत्र अस्तित्व नव्हते. श्यातून मग सतीप्रथेचा उदय झाला. प्राचीन भारतातील पहिली सती गुप्त काळात झाली. सती जाणाऱ्या स्त्रियांची स्मारके दक्षिणेत बऱ्याच ठिकाणी आहेत.[12]

मध्ययुगीन काळात स्त्रिची अवस्था अतिशय केविलवाणी झाली. मुलींच्या विवाहाचे वय कमी होवून बालविवाह, बुरखा पद्‌धती, बहुपत्नी विवाह, बुरखा, पडदा पद्‌धती रुढ झाली. बालविवाहांमुळे बालविधवांची समस्या निर्माण झाली. पती म्हणजे काय हे समजण्यापूर्वी तिला वैधव्य पदरी येत असे. मग तिने एक तर सती जावून आपली जीवनयात्रा संपवायची किंवा घराच्या कोणत्यातरी अंधार कोठडीवजा खोलीत विद्रुपावस्थेत अपमानकारक जीवन जगायचे हे दोनच पर्याय धर्मशास्त्रांनी शिल्लक ठेवलेले होते.[13] कन्येचा जन्म होणे ही अशुभ घटना समजली जात असे. फीरोज तुघलकाने स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अनेक निर्बंध लादले. राजकारणात स्त्रियांना सहभागी होता येत नसे. सुलताना रझियाही त्यामुळेच सुलतानपदावर अधिक काळ टिकू शकली नाही. मध्ययुगीन काळात धर्मशास्त्रे, स्मृति व श्रुतींना प्रमाण मानले जात असे आणि या वाङ्‌मयाने स्त्री स्वातंत्र्य नाकारलेलं होतं. सम्राट अकबराने समाजात शेकडो वर्षापासून चालत आलेले अनेक दोष निवारण्याचा प्रयत्न केला. बालविवाह, सती प्रथा, मानवबलिदान विरोधी भूमिका घेतली. चॉदबीबी, रजिया सुल्ताना यांना सोडले तर त्याकाळची सामान्य स्त्री पडद्याआड होती. प्रागैतिहासिक काळापासून मध्ययुगीन काळापर्यंतच्या स्त्री–जीवनाचा ओझरता आढावा इथे घेतला.

वेदकाळापर्यंतची स्त्री स्वयं प्रकाशित होती. पुढे तिच्या दर्जात कमालीची घसरण होत गेली. जीवनाच्या अंधारात हरवलेल्या स्त्रिला संतांनी भक्ती स्वातंत्र्याच्या प्रकाशाची वाट दाखविली. महानुभाव पंथातील महदाइसा, कमळाइसा, हिराइसा या स्त्रियांना मानाचे स्थान होते. भागवत संप्रदायातील मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, दत्तसंप्रदायातील वेणाबाई यांचा आदर केला जाई. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या संतकवयित्रींनी भक्ति स्वातंत्र्यातून आध्यात्मिक विकासाचा अनुभव घेतला पण स्त्री जीवनाचा दाहक अनुभव त्यांच्या लेखनातून जाणवतो. समाजात महात्मा बसवेश्वरांसारखे स्त्री–सुधारणांचा पुरस्कार करणारे संत होते तसे गंगाधर स्वामीसारखे स्त्री व्देष्टेही होते. या काळातील स्त्री परिस्थितीशी तडजोड करण्यात समाधानी नव्हती तर तिने परिस्थितीवर मात केली. जिजाबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडेंचा पराक्रम या गोष्टीचे निदर्षक आहे.

इंग्रजांनी या देशात पाय रोवल्यानंतर आंलाशिक्षणातून सुधारणांसाठी आवश्यक असलेले नवी दृष्टी प्राप्त झाली. पाश्चात्य संस्कृती, सभ्यता, ज्ञानविज्ञान, सामाजिक संस्था याचे ज्ञान झाले व या ज्ञानाच्या प्रकाशात समाजाचा कायाकल्प घडवून आणण्याचा प्रयत्न सुधारकांनी केला. शिक्षणाने स्त्रिया बिघडतील, विधवा होतील, अमर्यादा होईल असा समज असलेल्या काळात ब्राह्मो समाजाने समाज सुधारणेचा वसा घेतला. ह्या समाजाने पडदा पद्धतीचा धिक्कार करुन स्त्रियांना शिक्षणक्षेत्राची व्दारे खुली केली. बालविवाहाचा निषेध, विधवापुनर्विवाहाचा पुरस्कार, बहुपत्नित्वाला विरोध इत्यादी सुधारणांवर भर दिला. प्रार्थना समाज, सत्यशोधक समाजानेही स्त्री–स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्त्री–शिक्षण, विधवा विवाह, अनाथाश्रम, विधवाश्रम काढले. पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे, राजाराममोहन राय, म. फुले, सावित्रीबाई फुले, रा. गो. भांडारकर, न्या तेलंग, पं. रमाबाई यांनी स्त्री सुधारणांना प्रेरक कार्य केले. ही चळवळ आजपर्यंत अखंड चालू आहे. स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला. निसर्गतःच सुसंस्कृत असलेली स्त्री सुशिक्षित होवून सन्मानाने जगु लागली. शिकली सावरलेली स्त्री, इतर उपेक्षित स्त्रियांसाठी अविरत झगडू लागली. गर्भजल परीक्षा, भ्रुणहत्या, विनयभंग, बलात्कार, प्रेमभंगातून हत्या अशा अमानवी कृत्यांना ती आजही बळी पडत आहे. स्त्रियांना अधिकाराची जाणीव करुन देणे, स्त्रीची प्रतिष्ठा उंचावणं, समान संधी समान वेतन, पीडितेला साह्य, संरक्षण, स्त्रियांसाठी रोजगार हमी योजना, शिक्षणात आणि नोकरीत आरक्षण, नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी पाळणाघरे, बालवाड्या या मागण्यांसाठी ती स्वायत्त आणि राजकीय संघटनांव्दारे लढते आहे. सामाजिक, राजकीय,

आर्थिक अशा विकासाच्या सर्वच क्षेत्रात तिने उंच झेप घेतली आहे. सृष्टीच्या निर्मितीपासूनची स्त्रीची ही संघर्षाची वाटचाल या वाटचालीत तिने अनेक संकटांना तोंड दिले, आपलं अस्तित्व टिकवलं. स्त्री–पुरुष परस्परपूरक आहेत हे समाजमनावर बिंबवलं. पायदळी तुडवलं गेलेलं स्त्री दाक्षिण्य परत मिळवलं. भारत हा जगातील तिसरी महासत्ता बनु पाहणारा लोकशाही प्रधान देश. स्त्री स्वातंत्र्याचे वारेश्या देशात फोफावत असताना स्त्रीच्या अवहेलनेची परंपरा मात्र मुळ सोडत नाही. राजस्थानमधील देवडा या गावात प्राचीन काळापासून बालिका हत्येची क्रूर प्रथा चालत आली आहे. गेल्या 120 वर्षात या गावात केवळ दोन मुलींना जीवदान मिळाले आहे. ही बाब सबंध मानवजातीसाठी लांच्छानास्पद आहे.

उन्मत्त पुरुषी महत्वकांक्षेला जीव मुठीत धरुन प्रतिकार करत मानवी जीवनाचा विकास साधणारी आजची स्त्री आहे. तिच्या या पवित्र, मंगल धीरोदात्त संघर्षाला समाजातील उपद्रवी घटकांकडून गालबोट लागू पहात आहे. आज चित्रपट, दूरदर्शन त्यातील जाहीराती, मालिका, पोस्टर्स यातून होणारे स्त्रियांचे देहप्रदर्शन, नग्नता, विवाहबाह्य संबंध यांचे सर्रास प्रसारण होत आहे. हॉटेल, बार, पब्स, सौंदर्यस्पर्धा यातून स्वैराचार बोकाळू लागला आहे. परिणामी स्त्रीजातीच्या सन्मानाला धोका पोहचतो आहे. स्त्रियांवरची आतापर्यंतची संकट पुरुषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेली होती. त्यातून तिने स्वतःची मुक्तता करुन घेतली. प्रसारमाध्यमातून आलेल्या या सांस्कृतिक अराजकतेला मात्र वेळीच पायबंद घातला नाही तर मोठे अरिष्ट ओढवेल. शिक्षणाने स्त्रीला जगण्याची नवी दृष्टी दिली. विकासाचे पंख दिले. स्त्री मर्यादा उल्लंघन आणि संस्कृती रक्षणाच्या निमित्ताने कदाचित ती पुन्हा चार भिंतीत बंद होईल.

## संदर्भ ग्रंथ

1. स्त्री पर्व – मंगला सामंत, पृष्ठ 23 2. हिंदू सामाजिक संस्थाऐं – शिवरुप सहाय, पृष्ठ 152 3. भारतीय संस्कृती – डॉ. प्रीतिप्रभा गोयल, पृष्ठ 128 4. नारी : एक विवेचन – धर्मपाल, पृष्ठ 6 5. भारतीय नारी दशा, दिशा – आशाराणी व्होरा, पृष्ठ 05 6. स्त्री पर्व – मंगला सामंत, पृष्ठ 75 7. भारतीय संस्कृती – डॉ. प्रीतिप्रभा गोयल, पृष्ठ 129 8. स्त्री पर्व – मंगला सामंत, पृष्ठ 75 9. मनुस्मृति : 3157 10. भारतीय संस्कृतीचा इतिहास–डॉ. आर. एस. मोरवंचीकर, प्रा. एन. एस. निकम, पृष्ठ 134 11. प्राचीन व मध्ययुगीन भारत – प्रा. मदन मार्डीकर, पृष्ठ 45 12. मध्ययुगीन भारताचा इतिहास–वसंत तुकाराम देशपांडे पृष्ठ 184,185 13. दक्षिण भारताचा इतिहास – प्रा. अनिल सिंगोर, पृष्ठ 214